Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-II Feb. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Vol - III Issue-II FEBUARY 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

# मराठवाडयातील ओवीगीते : स्त्री मनाच्या विविध पैलूंचे दर्शन

**डॉ.जाधव पद्मा मोहनराव,**
सहयोगी प्राध्यापक,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
आय.ए.एस.ई., औरंगाबाद.
E-mail- dr.pmj@rediffmail.com

## सारांश

आपला देश कृषिप्रधान देश आहे. या कृषिप्रधान देशातील मानवाचे जीवन अत्यंत कष्टप्रद होते. शेती, शेतीशी संबंधित कामे, घरातील विविध कामे ही अत्यंत कष्टाची कामे. मात्र या भूमीतील माणसाने या कामांना गीत संगीताचे आधिष्ठान प्राप्त करुन दिले आणि श्रमाचे मूल्यच वाढविले असे म्हणावे लागेल. ग्रामीण भागातील लोकसमूहांनी तर या गीतांच्या माध्यामातून अक्षर वाङ्मयाचीच निर्मिती केली आहे. हे अक्षर वाङ्मय म्हणजे परंपरेने विकसित झालेले मानवी जीवनच आहे. या मानवी जीवनाचे अनेक पदर या गीतांमधून उलगडलेले आहेत. शिवाय त्यांना वाङ्मयीन मूल्य देखील प्राप्त झाले आहे.

मराठवाडयातील समाज मोठया प्रमाणात ग्रामीण भागात असणारा समाज आहे. अक्षर ओळख नसलेला पण जीवनविषयक तत्त्वज्ञान अत्यंत समृद्ध असलेला असा हा समाज आहे. स्त्रिया हा या समाजातील एक प्रमुख घटक आहे. मराठवाडयाच्या ग्रामीण भागातील स्त्रिया या कोणत्याही शाळेत शिक्षण न घेतलेल्या, श्रमालाच आपली देवता मानून निष्ठेने श्रम करणाऱ्या आणि ही श्रमाची कामे करतांना गीत गाऊन त्याद्वारे श्रमानंद प्राप्त करणाऱ्या अशा आहेत. मात्र भाषेच्या अभ्यासकांच्या आणि संशोधकांच्या भाषाज्ञानाला आणि शब्दज्ञानाला, साहित्यनिर्मितीला लाजवेल अशी साहित्यनिर्मिती या स्त्रियांनी केली आहे.

आपली दैनंदिन कामे पूर्ण करतांना, विविध विधी, उत्सव प्रसंगी म्हणावयाची गाणी, ओव्या, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार इत्यादींची निर्मिती त्यांनी केली आहे. यापैकी ओवीगीते ही अत्यंत वैशिष्टयपूर्ण निर्मिती या स्त्रियांचीच देण आहे. पूर्वी जात्यावर दळण दळणे हे स्त्रीचे नित्यकर्मच होते. परंतु या श्रमाच्या कामाला तिने जोड दिली ओवीगीतांची आणि त्यामधून तिने निर्माण केले ओवीगीतांसारखे अक्षर वाङ्मय. सर्वार्थानी समृद्ध अगणित अशा स्वतंत्र रचना येथील स्त्रियांनी निर्माण केल्या. जात्यावर दळण दळणाऱ्या स्त्रियांना शब्द, स्वर आणि लय यांच्यातील सुसंगती साधून उत्स्फूर्तपणे गायनाची उर्मी प्राप्त होते. दळण, दळणाच्या प्रक्रियेतूनच या पारंपरिक जीवन जगणाऱ्या स्त्रीच्या जीवनाचे आशयकोश आणि भावकोश या ओवीगीतांमधून प्रकट होतात. त्यामधूनच स्त्रीचे जीवनविषयक तत्त्वज्ञान उलगडत जाते.

**प्रास्ताविक**

मराठवाड्याला अत्यंत समर्थ अशी वाङ्मयीन परंपरा लाभलेली आहे. या वाङ्मयीन परंपरेतील एक उत्कट, सहजस्फूर्त आविष्कार म्हणजे जात्यावरच्या ओव्या हा होय. त्यातून मराठवाड्यातील समाजजीवनाचे, जीवनव्यवहारांचे, चालीरीतींचे, नातेसंबंधांचे, येथील श्रद्धाविश्वाचे आणि उज्ज्वल सांस्कृतिक ठेव्याचे दर्शन घडते. हा ठेवा जतन होणे या ठेव्याच्या माध्यमातून भावी पिढयांवर अनौपचारिक पद्धतीने होणारे संस्कार, कुटुंबजीवन कुटुंबातील सदस्यांप्रती स्त्रीच्या मनात, ह्दयात असलेली भावना, ओव्यांमधून प्रतिबिंबित होणारे जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि स्त्री मनावर झालेले संस्कार या सर्व बाबींची प्रचीती येते. म्हणून हे संस्कार संचित जतन होणे भावी पिढयांना त्यांचे महत्त्व आकलन होणे आणि या ठेव्याचे भावी पिढयांकडे संक्रमण होणे अत्यंत आवश्यक आहे. भावी पिढयांना आपल्या भारतीय संस्कृतीच्या विविध आयामांचा परिचय होणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने या ओव्यांच्या माध्यमातून प्रकट होणारे विविध पैलू स्पष्ट करण्याचा प्रयत्न आला आहे.

**ओवी संकल्पना**

१) ज्या वाङ्मयात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला आहे असे वाङ्मय म्हणजे ओवी.

२) ज्यात्यावर दळतांना, पाळणा हलवितांना, झोपाळ्यावर झोके घेतांना सहजस्फूर्त रचल्या गेलेल्या आणि अकृत्रिम, सहदयता, अपूर्व वत्सलतेचा सिंधू असलेल्या स्त्रियांच्या रचना म्हणजे ओवी.

३) जात्यावर दळण दळतांना जात्याच्या गतीबरोबर शब्द आणि भाव यांची उत्कट अभिव्यक्ती ज्या स्त्रीगीतातून होते असा लोकगीतांचा प्रकार म्हणजे मौखिक ओवी.

४) कौटुंबिक जिव्हाळ्याच्या, नात्याच्या, श्रद्धाविश्वाशी संबंधित विविध देव-देवतांच्या आणि सामाजिक रुढी, प्रथा, परंपरा आणि सांस्कृतिक संकेताच्या संदर्भातील स्त्रीचे भावविश्व जात्यावर दळण दळताना ज्या शब्द आणि स्वरांमधून साकार होते अशी स्त्रियांची निर्मिती असलेली गेय रचना म्हणजे ओवी.

**ओवीगीतातून स्त्री मनाच्या विविध पैलूंचे होणारे दर्शन**

मराठवाडयात विकसित झालेली ओवीगीते हा स्त्रीमनाच्या विविध भावभावनांचा प्रभावी आविष्कार आहे. स्त्रियांची मौखिक ओवीगीते हे परंपरेने चालत आलेल्या एकूण मौखिक वाङ:मयाचे एक अत्यंत समृद्ध दालन आहे. समाजाच्या जीवनाची ती गाथा आहे. ही ओवीगीते स्त्रीमनाच्या अनेक भावभावनांनी आणि अंतरीच्या उमाळयाने ओथंबलेली आहेत. स्त्रियांच्या हदयाची स्पंदने जाणकाराला त्यांनी गायलेल्या मौखिक ओव्यांमधून ऐकू येतात. प्रत्यक्ष लोकजीवनातून या गाण्यांची निर्मीती झालेली असल्यामुळे त्यातून समाजजीवन अभिव्यक्त झालेले आहे. जीवनाला सौंदर्य संपन करुन जगण्याची भारतीय लोकमानसातील प्रवृत्ती मराठवाडयातील स्त्रियांच्या मौखिक ओवीगीतातून प्रकट होते. स्त्रियांनी गायलेल्या विविध ओव्या सामाजिक प्रथापरंपराचे, चालिरीतींचे संदर्भ स्पष्ट करतात. या ओवीगीतातून स्त्रीमनाच्या विविध पैलूंचे दर्शन खालीलप्रमाणे होते.

**समाजाच्या धार्मिक, आध्यात्मिक मूल्यांच्या आधिष्ठानाचा आविष्कार**

स्त्रीजीवनातील धार्मिक भावचित्रे ओव्यांमधून प्रकट झालेली आहेत. स्त्रियांच्या ओव्यांमधून समाजाच्या धार्मिक, आध्यात्मिक आधिष्ठानाचा आपणास प्रत्यय येतो.

उदा १) आळंदीची वाट, गेली देहुला कोरडी ।
इंद्रवतीच्या काठाला, तुका बांधतो झोपडी ।।
२) इठ्ठल रुख्मीन, पंढरीच्या ग किल्ल्यात ।
याहीच्या सारखा, जोडा नाही पिरथमीत ।।

समाजमनात राम-सिता, विठ्ठल-रुक्मिनी, खंडोबा, तुळजापुरची अंबाबाई, भक्त कुंडलिक, जनाबाई, साधुसंत याविषयी श्रद्धाभाव आहे. तो अत्यंत भाविक वृत्तीने व श्रद्धाशील मनाने ओव्यांमधून व्यक्त झालेला आहे.

तुळशीचा बाग, वाळून कोळ झाला ।
देवा इठ्ठलानं, शेलियान गोळा केला ।।

या सारख्या ओव्यांमधून दारातील तुळशीबद्दल तिच्या मनात नितांत आदर आहे. चंद्र, सूर्य, चंद्रभागा, गोदावरी, वृक्ष इत्यादींचे चित्रण ओव्यांमधून झालेले आहे. त्यातून व्यक्त होणा-या मनाच्या धार्मिक व भाविक वृत्ती स्पष्ट होतात, तसेच या भावभिव्यक्तीला लाभलेले धार्मिकतेचे पवित्र वलयही पहावयास मिळते. थोडक्यात मराठवाडयातील किंबहुना महाराष्ट्रातील विविध श्रद्धास्थानांचे प्रतिबिंब या ओवीगीतांमध्ये पहावयास मिळते.

**कौटुंबिक भावबंधांचे नैसर्गिक चित्रण**

मौखिक ओवीतून कौटुंबिक जीवनातील भावबंध अत्यंत सार्थपणे चित्रित झालेले आहेत. त्यात सहजता आहे. कोठेही कृत्रिमतेचा स्पर्श जाणवत नाही. लोकगीतातून प्रकट झालेले हे कौटुंबिक भावविश्व भावरम्य आणि हृदयस्पर्शी बनलेले आहे.

**नातेसंबंधांची घट्ट वीण**

आई-वडील, भाऊ-बहिण, पती-पत्नी, सासू-सासरे, नणंद-भावजयी, जावा सखी-शेजारीण, अशा कुटुंबाजीवनातील, विविध नातेसंबंधांचा, कुटुंबातील विविध जीवनव्यवहारांचा प्रत्यही संबंध असतोच. कौटुंबिक जिव्हाळ्याच्या या नात्यातील भावसंबंधातून संसारातील, जीवनातील जीवनानुभूती पहावयास मिळते. कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नातेसंबंधांची घट्ट वीण या ओवीगीतातून अत्यंत सहजगत्या प्रकट झालेली आहे.

**ओवीगीतातील आईची प्रतिमा**

ओवीगीतातून कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाते संबंधातील विविध स्त्रीप्रतिमांचे दर्शनही उत्कटतेने झालेले आहे. त्यातील आईची प्रतिमा अत्यंत आगळी वेगळी आहे.

उदा. १) मांडीचा चावरंग, नेतराचा केला दिवा ।
उपकार फेडू कसा मायबाई ।।

२) माय माऊलीचे कष्ट, कसे रे फेडू देवा ।
तळहाताचा पाळणा, नेतराचा केला दिवा ।।

३) आई म्हणू आई, आई साखरेची लाही ।
पिरथमी धुंडल्यानं, तिच्या सारखी माया नाही ।।

४) आई म्हणू आई, आई साखर फुटाणा ।
बयाचे शब्द गोड, मला उठूशी वाटना ।।

या आणि या प्रकारच्या ओव्यांमध्ये आई-एक सोशीक, सुसंस्कारी, जगदंबेचे रुप असलेली जन्मदात्री, कितीही केले तरी तिचे उपकार फेडता येणे शक्य नाही अशी त्यागी आणि सहनशीलतेचे, निर्व्याज प्रेमाचे प्रतिक अशी प्रतिमा ओव्यांमधून व्यक्त झालेली आहे.

**मुलीवर होणारे अभंग संस्कार**

जात्यावरच्या ओव्यांमधून आई मुलीवर करीत असलेल्या संस्कारातील सहजता आणि दुरदर्शीपणाचा प्रत्यय येतो. हे संस्कार मुलीला जन्मभर उपयोगी पडतील, आपलं चारित्र्य जपण्याची दृष्टी देतील असे आहेत हे संस्कारसंचितांच आधिष्ठान या ओव्यांना प्राप्त झालेले आहे.

उदा. १) हासू नको नारी, हशाचा भरम मोठा ।
आस्तुरीचा जल्म खोटा, नावा लागेल बट्टा ।।
२) पर पुरुषाच्या, उभं राहू नये साऊलीला ।
साळू गं बाई माझे, बोल येतो माऊलीला ।।

या सारख्या ओव्यांमधून याचा पदोपदी प्रत्यय येतो.

**सासूची उभय रुपे**

ओवीगीतांमध्ये सासूचे वर्णन करतांनाही स्त्री थकत नाही सासुविषयीच्या ओव्यांची संख्या विपुल प्रमाणात आढळते.

उदा. १) सासू – सासरे, माझ्या देव्हाऱ्याचे देव ।
पडते यांच्या पाया, मनी नाही दुजा भाव ।।
२) सासूचा सासुरवास, सोसल्याने काय होत ।
दोन्ही कुळा, नाव येत ।।
३) सासू करी सासुरवास, भाऊ ऐके आडभिती ।
बोलतो भाऊराया, बाई तुझी धन छाती ।।

अशा ओव्यांमधून सासू कधी आईच्या रुपात तर कधी सुनेला सासुरवास करणारी अशी दोन्ही रुपे सासुविषयीच्या ओव्यांमधून प्रकट झालेली दिसतात.

**नणंदेची उभय रुपे**

ओवीगीतात नणंद भावजयी यांच्या नात्यातील दोन्हीही पदर उलगडलेले आहेत.

उदा. १) माझ्या अंगणात, लवंगाचा झाला सडा ।
नणंदेची बोळवण, नंदायाला देते विडा ।।

२) नंणदेचा सासुरवास, तिने मांडिला कहर ।
माझ्या भरताराच्या मनी, तिने भरील जहर ।।

अशा ओव्यांमधून नणंद भावजय यांचे नाते, त्यांच्यातील प्रेम, नंणंदेकडून भावजयीस होणारा त्रास, भावाच्या संसारात नणंदेची होत असलेली लूडबूड इत्यादीचे वर्णन अत्यंत समरसतेने या ओवीगीतात आलेले आहे.

**सौभाग्याची महती**

ओवीगीतांमध्ये स्त्रीने आपल्या सौभाग्याच वर्णन अत्यंत विशाल दृष्टीने केले आहे. आपल्या आयुष्याचे सर्वस्व, संपूर्ण जीवनाची सार्थकता म्हणजे पतीची सेवा या विषयीचा दृढभाव, पतीप्रेमावरील निष्ठा या प्रकारच्या ओव्यांमधून लक्षात येते.

उदा. १) शेज बाजवरी, भरतार देवरुप ।
नेनंतीबाई माझी, इसरली मायबाप ।।

स्त्रियांची पतीवर असलेली श्रद्धा, पत्नी म्हणजे पतीला परमेश्वर मानून त्याची सेवा करण्यात धन्यता मानणारी, सर्व अलंकारात पती, सौभाग्याचा अलंकार म्हणून त्याची महती ओवीगीतात आलेली आहे.

१) दुबळया भरताराची नको करुस हेळना ।
कपाळीच कुंकू, सोनं दिल्यान मिळना।।

२) आहेव मरणाची, आहे मला ग आवड ।
हळदी कुंकवाची, पुढं निघाली कावड।।

अशा प्रकारच्या ओवीगीतांमधून पतीचं पत्नीच्या जीवनातील स्थान, अत्यंत महत्त्वाचे मानले गेले त्यामुळेचे आहेव मरणाची आशा बाळगणारी, किंबहुना भूषण मानणारी पत्नी या प्रकारच्या ओव्यांमधून प्रकट झालेली आहे.

**ओवीगीतातील स्त्री प्रतिमा**

ओवीगीतातून कौटुंबिक जिव्हाळयाच्या नातेसंबंधातील विविध स्त्रीप्रतिमांचे अत्यंत यथार्थ दर्शन या ओव्यांमधून अगदी उत्कटतेने घडते. ओवीगीतांमधून मराठी स्त्रीमनाच्या विविध भावभावनांचे प्रकटीकरण झालेले आहे. एक मुलगी, बहिण, पत्नी, प्रेयसी, सासू, आई, नणंद, भावजयी, शेजारीण, भाची, आत्या म्हणून हे स्त्रीमन ओव्यांमधून प्रकट होते. या मनातील भावस्पंदने शब्दांमधून प्रकट होतात.

**ओवीगीतातील पुरुष प्रतिमा**

मौखिक ओवीगीतात अनेक पुरुष प्रतिमांचा उल्लेख आलेला आहे. वडील, मुलगा, भाऊ, सासरा, पती, दीर, जावई, काका, मामा, याशिवाय भाचा इत्यादी पुरुष प्रतिमांचे स्वभावविशेष ओव्यांमध्ये प्रतिबिंबित होतात. समाजातील पुरुष प्रधान संस्कृतीचे प्रतिबिंब देखील या ओव्यांमध्ये पडले आहे. सर्वच पुरुष प्रतिमा करारी, कर्तव्यदक्ष आणि जबाबदार पुरुष, कुंटुंबाचा कर्ता यादृष्टीने आल्या आहेत.

उदा. १) बाप म्हणे लेकी, लाडकी होऊ नको ।
जाशील परघरी, वेडी माया लावू नको।।
२) काय सांगूबाई, माझ्या माहेराची बढाई ।
भाऊच्या मांडीवर, चंद्रसूर्याची लढाई ।।

बाप म्हणजे गार वडाची सावली, भाऊ हा स्त्रीचा आधार, विसाव्याचे झाड, माहेरचा गारवा, पती म्हणजे सर्वस्व, जीवनाचा आधार, वडिलानंतर आधाराच स्थान म्हणजे काका, सासरी दीर म्हणजे माहेरचा भाऊ, सासरा म्हणजे सासरघरी वडीलच अशा पुरुषांच्या विविध प्रतिमा ओवीगीतात मांडल्या आहेत. पुरुषांच्या रागीट स्वभावाचे चित्रणही तितक्याच परखडपणे या ओवीगीतांतून आले आहे. समाजावरील पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा, पुरुषांचे कुटुंबातील वर्चस्व याचे प्रतिबिंब या ओव्यांमध्ये पडलेले आहे.

**श्रमप्रतिष्ठेचे मूल्य**

श्रमनिष्ठा, श्रमप्रतिष्ठा आणि श्रमानंद यांचा सुयोग मिलाफ ओवीगीतांच्या माध्यमातून पहावयास मिळतो.

उदा.१) जात्या तू ईसवरा, नको मला जड जाऊ ।

बयाच्या दुधाचा, सया पाहतात अनुभवु ॥

ओवीगीत हे मुख्यत: श्रमगीतच आहे. जात्यावर दळण दळणे हे श्रमाचेच काम आहे. हे काम करतांना त्या जात्याला ईश्वर मानून त्याच्याशीच संवाद साधतात. म्हणजेच श्रम, कष्ट याबद्दल कोणतीही तक्रार न करता ओवीगीत गातांना श्रमानंद अनुभवतात. अंतरीचे बोल, नात्याविषयीचे प्रेम, राग व्यक्त करणे, ईश्वराची आळवणी करणे यामुळे श्रम कधी हलके होतात याचे स्वत: त्या स्त्रीलादेखील भान नसते. म्हणजेच जात्यावरच्या ओव्यांना श्रमप्रतिष्ठेचे मूल्य प्राप्त झाले आहे हे सिद्ध होते.

**समाजातील मुलींचा दर्जा**

मौखिक ओवीगीतातून समाजातील रुढी, प्रथा, परंपरा यांचे अनेक संकेत मिळतात. समाजातील विविध रुढी प्रथा परंपरा या जात्यावरच्या ओव्यांमधून सहजपणे डोकवतात. समाजात मुलीला असलेला दर्जा या ओव्यांमधून स्पष्ट होतो.

उदा. १) पडतो पाऊस, मिरगा आधी रोहिणीचा ।

बाई हालतो पाळणा, भावा आधी बहिणीचा ॥

'पहिली बेटी, तूपरोटी,' 'पहिली बेटी, धनाची पेटी' अशी समजूत समाजात आहे. आईची मुलीवर विशेष माया आहे. म्हणूनच ओव्यांमध्ये मुलांपेक्षा मुलींवरचा ओव्या अधिक आहेत.

उदा. लेकाच्या परीस, मला लेकीची आगद ।

सरगीच्या (स्वर्गीच्या) वाटं, मैना वाचिती कागद ॥

याप्रमाणे ओव्यांमध्ये मुलांपेक्षा मुलींवरच्या ओव्या अधिक आहेत. मुलगी म्हणजे परक्याचे धन, परक्याच्या घरी तिला कशी वागणूक मिळेल याची आई- बापास असलेली चिंता देखील ओवीगीतांमधून प्रकट होते.

उदा. १) लेकीचा जनम, रानातली पातर ।

जिवा लागली कातर ।।

मुलीला सासरी करावे लागणारे काबाडकष्ट, तिची पराधीनता, तिला होणारा सासुरवास, हा सासुरवास हिने निमुटपणे सहन कसा करावा या सर्व बाबी ओवीगीतात प्रकट झालेल्या आहेत.

**निपुत्रिक स्त्रीच्या वेदनांची अभिव्यक्ती**

निपुत्रिक स्त्रीची समाजाकडून हेळसांड होत आलेली आहे. तिला समाजात अनेक प्रकारच्या यातना सहन कराव्या लागतात. समाजात तिची होत असलेली अवहेलना ओवीगीतातून प्रकट झालेली दिसते. या अभिव्यक्तीमधून तिची वेदना वाचकाच्या हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय रहात नाही.

उदा. देवा मला देरे, देव देईल कुठूनी ।

संतानप्राप्ती नाही, संचिता वाचूनी ।।

अशा प्रकारच्या ओव्यांमधून निपुत्रिक स्त्रीचे दु:ख देखील अत्यंत उत्कटतेने प्रकट झालेले आहे. परंतु त्याचा दोष ती इतरांना देत नाही तर हा संचिताचा भाग म्हणून स्वीकारते ही तिची उदार दृष्टी यामधून प्रकट होतो.

**विधवांची होणारी आबाळ**

पती निधनानंतर पूर्वीपासूनच समाजात स्त्रीची आबाळ होत आलेली आहे. त्यामुळेच ती पतीच्या आधी म्हणजेच आहेव मरणाची अपेक्षा व्यक्त करते. पतिनिधनानंतर हालअपेष्ठा सहन करत जगण्यापेक्षा त्याच्या अगोदर मृत्यू येणे ही अभिमानाची बाब मानणारी स्त्री ही या मराठवाडयात घडलेली आहे. आहेव मरणाची अपेक्षा ही स्त्री ओव्यातून व्यक्त करतांना दिसते.

उदा. आहेव मरण, माय बाईन साधलं ।

हळदी कुंकवाच लेणं, पदरी बांधिलं ।।

अशा ओव्यांमधून तिची पतिनिष्ठा, जगण्याबद्दलची दृष्टी आणि मृत्यूच्या भयाच्या पलिकडे असलेली श्रद्धा स्पष्ट होते.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

**दु:ख सोसण्याची स्त्रीची मानसिकता**

स्त्रियांचे जीवन कष्टप्रद असते, वेदनादायी असते, सासुरवास सहन करणे हा तिचा पिंडच या समाजव्यवस्थेने निर्माण केलेला आहे. तिची ही मानसिकता तयार झाली त्यामुळे या त्रासाबद्दल, सासुरवासाबद्दल, नणंद, जावा, पती यांच्याबद्दल ती तक्रार करत नाही तर तो तिच्या विधिलिखिताचा, भाग्याचाच एक भाग म्हणून त्याचा आनंदाने स्वीकार करते. त्यामुळे सासरचे गोडवे गाण्यातच ती धन्यता मानते.

**स्त्री : कुटुंबसंस्था टिकविण्यातील केंद्रबिंदू**

कुटुंबसंस्था टिकून राहण्यात स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. स्त्री ही कुटुंबाचा आधार असते. स्त्रिया सोशीक, सहनशील आणि उदार मनाच्या असल्यामुळे आजपर्यंत कुटुंबाचे स्थैर्य टिकून आहे हे या ओवीगीतातून स्पष्ट होते.

**नातेसंबंधाबाबत समाजाने स्वीकारलेले मूळ सूत्र**

कुटूंबातील, समाजातील विविध नातेसंबंधाची विण घट्ट असल्यामुळे परंपरागत समाजजीवन विविध कष्ट आणि त्रास असूनही आंनदी आहे याची प्रचिती या मौखिक ओवीगीतामधून अत्यंत प्रभावीपणे येते. म्हणजेच समाजातील नातेसंबंध हे समाजव्यवस्था टिकण्यासाठी निकोप असावे लागतात हे समाजाने स्वीकारलेले मूळ सूत्र आहे हे आपल्या भक्कम कुटुंब व्यवस्थेचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. याची प्रचिती सर्वच ओवीगीतांमधून येते.

**सांस्कृतिक ठेवा**

मौखिक ओवीगीतातून समाजाच्या विशेषत: स्त्रीच्या सांस्कृतिक जीवनाचा, त्यातून प्रतिबिंबित होणा-या सांस्कृतिक मूल्यांचा परिचय आपणास होतो. स्त्रीवर, स्त्रीमनावर झालेले संस्कार या ओव्यांमधून प्रकट होतात. त्या संस्कारामुळेच मनाला मोठेपणा प्राप्त होतो. जीवन जगत असताना जीवनविषयक उदात्त मूल्ये जोपासणा-या मनाला प्रत्यक्ष जीवनात आणि साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे.

समाजाने स्वीकारलेली जीवनपद्धती, जीवनाला असलेल्या जीवनमूल्यांचे, सामाजिक, सुसंस्कारविषयक, धार्मिक मूल्यांचे आधिष्ठान यांच्या प्रत्यय ओव्यांमधून येतो. एक उदात्त संस्कृतीचा भव्य दिव्य आवष्किार या ओव्यांमधून प्रकट होतो.

आईकडून मुलीवर होणारे संस्कार, तिला मिळणारे जीवनविषयक मार्गदर्शन, जीवनातील ऊन-सावली म्हणजेच सुख:दु:खांना पचविण्यासाठी लागणारी सहनशीलता हे सर्व संस्कार, संचित हा या सांस्कृतिक ठेव्याचाच महत्त्वाचा भाग आहे. तो ओव्यांमध्ये अत्यंत समर्थपणे चित्रित झालेला आहे. समाजातील विविध कार्यांना असलेले विधींचे, संस्काराचे आधिष्ठान या ओव्यांमधून व्यक्त होते त्यामुळे या संस्कार संचिताचाही प्रत्यय ओव्यांमधून येतो.

**उत्तुंग साहित्यिक अभिव्यक्ती**

मौखिक पंरपरेने चालत आलेल्या या ओव्यांना वाङ्मयीन मूल्य लाभलेले आहे. या मौखिक ओव्या रचणाऱ्या स्त्रिया पूर्णत: निरक्षर कोणत्याही प्रकारच्या औपचारिक शिक्षणाचा गंध नसलेल्या अशा आहेत. असे असूनही त्यांनी निर्माण केलेले हे अक्षरवाङ्मय हे भाषाशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या लेखकांनाही लाजवेल असे आहे. मौखिक ओव्यांची रचना, त्यातील शब्दांची चपलखपणे केलेली मांडणी आवश्यकतेनुसार रुपकांचा, अलंकारांचा झालेला वापर आणि आशयघनता यांचा प्रत्यय या ओव्यांमधून येतो. ओव्यांमधील शब्दवैभव, त्या शब्दांना असलेले भाव-भावनांचे आधिष्ठान, भावनांची शब्दमाध्यमातून झालेली उत्स्फूर्त अभिव्यक्ती यांचा उत्कट आविष्कार म्हणजे हे वाङ्मय आहे. सृष्टीत आणि मानवी जीवनात जे जे उदात्त आणि भव्य आहे त्याची अभिव्यक्ती वाङ्मयातून झाली तर ते जीवनाच्या दृष्टीने श्रेष्ठ ठरते. यादृष्टीने ही ओवीगीते मोलाची ठरतात.

**ओव्यांमधील विचार वैभव**

जात्याला ईश्वर मानून मराठी स्त्रीने आपले अंत:करण त्या जात्याजवळ मोकळे केले आहे. अंतरीचे गुज जात्याच्या साक्षीने तिने आळविले. जीवनातल्या सुखदु:खाच्या अनुभवातून आणि संस्कारीत मनातून तिने आपले हृद्गत व्यक्त केले आणि हे अनुभवाचे

बोल सांगण्याचा प्रयत्न तिने ओवीगीतांच्या माध्यमातून केला आहे. ओव्यांमधून उदात्त आणि जीवनसुगंध लाभलेले विचार व्यक्त झालेले आहेत. त्यामुळे या गीतांना एक वेगवेळपणा लाभलेला आहे. मानवी जीवनाचे आणि मनाचे अनेकविध पैलू त्यात पहावयास मिळतात. मराठी लोकजीवन, मराठी संस्कृती, मराठमोळे स्त्रीमन त्यातून व्यक्त झालेले आहे. म्हणूनच या विचारांची अभिव्यक्ती करणा-या ओव्यांना वाङ्मयीन मूल्य लाभलेले आहे. हे विचार सहजस्फूर्त आहेत. त्यात ओढाताण नाही, कृत्रिमता नाही, नाटकीपणा नाही, तर त्यात स्वाभाविकता, सहजता आहे. म्हणून ओव्या ज्या शब्दातून व्यक्त होतात ते शब्द केवळ शब्द न राहता अर्थपूर्ण विचार बनतात. या विचारांना जीवनानुभवांची साथ आहे, आणि या जीवनानुभवांना कसदार चिंतनाची साथ आहे. म्हणूनच त्यात विशालता, प्रगाढता आहे. प्रत्यक्ष जीवनातून हे विचार साकार झाल्यामुळे त्यात जिवंतपणा आहे, चैतन्य आहे.

एकंदरीतच या जात्यावरच्या ओव्यांना असलेले धार्मिक, कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, आधिष्ठान, त्यांना असलेली जीवनानुभवांची जोड आणि अंतरीच्या भावनेने सहजस्फूर्ततेने, उत्कटतेने अभिव्यक्त झालेले भाव यामुळे त्याला साहित्यिक आधिष्ठान प्राप्त झालेले आहे. त्याव्यतिरिक्त विचार वैभव, शब्दवैभव, कल्पना विलास आणि त्यातील आपलेपणाची चैतन्यदायी अनुभूती यामुळे या ओव्या व्यक्तीला एक वेगळाच चैतन्यदायी आनंद प्राप्त करुन देतात याबाबत कुणाचेही दुमत असणार नाही

**ओवीगीतांची आशयघनता**

ओवीगीतांचे सूक्ष्म अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, या ओवीगीतांमध्ये जीवनविषयक अत्यंत व्यापक आणि सखोल आशय दडलेला आहे. कमीत कमी शब्दांमध्ये खूप मोठा आशय व्यक्त करणे हे ओवीगीतांचे प्रमुख लक्षण आहे. कित्येक शब्दांचे आशय केवळ तीन ते साडेतीन चरणी ओवीमध्ये व्यक्त केलेले दिसतात.

उदा. १) आई म्हणू आई, साऱ्या संसाराची आई ।
जिथं मोडन काटा, तिथं येईन तुझी सई ।।

२) माय बापाच्या पोटी, लेक जन्मली सुंदर ।
देऊ नका सवतीवर, डोळ असून अंधार ।।
३) सासू नि सासरा, दोन्ही काशीची देवळं ।
चुडा माझा राजस बाई, वर निशाण पिवळं ।।

या सारख्या ओव्यांमधून खूप मोठा आशय व्यक्त करण्यात आलेला दिसतो. म्हणजेच आशयघनतेच्या दृष्टीने ओव्यांचे मूल्यमापन केले तर ते अधिक मौलिक आहे. योग्य शब्दांचा वापर करुन आपले म्हणने मांडण्याचे सामर्थ्य मराठवाडयातील स्त्रीला अवगत होते हे यावरुन स्पष्ट होते.

**ओव्यातील संस्कार मूल्यांचे आधिष्ठान**

जात्यावरच्या ओव्यांच्या माध्यमातून आईकडून कुटुंबातील व्यक्तींवर, मुलांवर अनौपचारिक स्वरुपात होणारे संस्कार याला तोडच नाही. मुलगी म्हणून तिचे आचरण कसे असावे, परक्या घरी गेल्यानंतर सासरकडील नातेसंबंधात मायेचा ओलावा कसा टिकून ठेवावा, कुटूंबजीवनातील 'आपलेपण' कसे जपावे, नैतिकदृष्टया व्यक्तीचे वर्तन आदर्शवत असणे किती आवश्यक आहे या आणि अशा प्रकारच्या अनेक संस्कार संचिताचा ठेवा जात्यावरच्या ओव्यांमधून जतन झालेला दिसतो.

यामधून आई आपल्या मुलीला केवढी मोठी शिकवण आणि संस्काराची शिदोरी देते याची कदाचित जिने ही ओवी रचली तिलाही कल्पना नसेल, पण अनौपचारिक संस्कार सहजगत्या आणि अत्यंत प्रभावीपणे होतात हे यातून स्पष्ट होते.

केवळ मुलगीच नाही तर कुटुंबातील इतर सर्व व्यक्तींचे एकमेकांशी आचरण कसे असावे याचे अप्रत्यक्षपणे धडेच जणू ती या ओवीगीतातून देते. नातेसंबंधांची जपणूक, भावनिक ओलावा, मनाची उदारता, सोशिकपणा, सकारात्मक दृष्टिकोनाचा विकास इत्यादी दृष्टीने जात्यावरच्या ओव्यांमधून होणारे संस्कार हे कोणत्याही प्रकारच्या शिक्षणापेक्षा अधिक दर्जेदार आणि सकस असे आहेत यात शंकाच नाही.

**मराठवाडयातील संस्कृतीची ओळख**

ओवीगीतांमधून मराठवाडयातील दैवते, श्रद्धास्थाने, येथील कुटुंबजीवन, समाजजीवन, येथील स्त्रियांची सोशिकता, सुसंस्कारक्षमता, तिचे सामर्थ्य, मराठवाडयातील कुटुंबजीवनातील बलस्थाने इत्यादींचा प्रत्येक ओवीमधून आपणास प्रत्यय येतो. या भूमीतील सुसंस्कारी मन हेच येथील वैभव आहे याची साक्ष आपणास या ओवीगीतांमुळे पटते. मराठवाडा हा आर्थिक, भौतिकदृष्टया कुणी मागासलेला मानत असतील तर तो असू द्या परंतु येथील सुसंस्कार, येथील संस्कार संचित याला तोड नाही. जीवन जगण्यासाठी केवळ आर्थिक घटकच नाही तर इतर सर्व घटक हे महत्त्वपूर्ण भूमीका पार पाडत असतात याची प्रचिती या ओवीगीतांमधून येते. मराठवाडयाच्या उदात्त, विशाल अशा संस्कृतीची ओळख या ओवीगीतातून होते आणि हेच या मराठवाडयाचे बलस्थान आहे असे म्हणावे लागेल.

**जाते, दळणप्रक्रिया आणि योगशास्त्र**

जात्यावर दळण दळण्याची प्रक्रिया आणि आरोग्य यांचा अत्यंत धनिष्ठ असा संबंध आहे. स्त्री जात्यावर दळण दळण्यासाठी एक पाय लांबवून आणि दुसऱ्या पायाची मांडी घालून बसते. अशा स्थितीत बसून दळण दळतांना बसण्याच्या स्थितीमध्ये मधूनमधून ती बदल देखील करत असते. कधी उजव्या पाायाची मांडी घालून डावा पाय लांबवते तर कधी डाव्या पायाची मांडी घालून उजवा पाय लांबवते. दळण दळतांना जात्याच्या गतीनुसार शरीराला मागे पुढे हेलकावे देते. योगशास्त्रीत अशा प्रकारच्या आसनस्थितीला जानुशिरासन असे म्हणतात. जानुशिरसनाचे अनेक फायदे आहेत. या आसनामुळे अतिसार, पंडुरोग, कृमीरोग इत्यादी रोग दूर होतात. वीर्यवृद्धी, यकृताची सुस्थिती व बरगडया सशक्त होणे इत्यादी गोष्टींसाठी हे आसन उपयुक्त आहे. म्हणजेच जात्यावर दळण दळण्याचे दैनंदिन कष्टाचे काम करताना आपोआपच जानुशिरासनाचे सर्व लाभ होतात. शिवाय जात्यावर दळण दळताना स्त्री ओव्या गाते. या ओव्या जात्याच्या गतीवर अवलंबून असतात. या ओव्या गातांना श्वासोच्छवासाची प्रक्रियादेखील विशिष्ट प्रकारे चालत असते. त्यामुळे कपालभाती, अनुलोम-विलोम अशा प्रकारचे प्राणायाम देखील सहजच होतात. या

प्राणायामांमुळे शरीरातील सर्व भागांना प्राणवायू पोहचून शरीर शक्तीशाली होणे, वजन कमी करणे, चित्ताची एकाग्रता वाढवणे, मानसिक ताणतणाव नाहीसा करणे, रक्तदाब, मधुमेह इत्यादींवर नियंत्रण मिळविणे हे शक्य होते. शिवाय अपचन, बद्धकोष, पित्तवृद्धी इत्यादी व्याधींपासून मुक्तता मिळविणे, सर्दी खोकला आणि श्वासाच्या विकारांवर नियंत्रण आणणे आणि महत्त्वाचे म्हणजे आयुष्यवृद्धी यांसारखे अनेक फायदे या विविध प्रकारच्या प्राणायामांनी होतात ते सर्व फायदे जात्यावर दळण दळण्याच्या कामामुळे होतात.

**समारोप**

मौखिक परंपरेने चालत आलेल्या या जात्यावरच्या ओव्यांमधून मराठवाडयातील स्त्रीमनाच्या विविध पैलूचे अत्यंत सहजस्फूर्त असे दर्शन घडते आणि त्यामधूनच या भूमीतील स्त्रीमनावर झालेल्या विविध संस्कारांचा, तिच्या जीवनाला असलेल्या तात्त्विक सामाजिक, सांस्कृतिक आधिष्ठानाचा प्रत्यक्ष आपणास येतो. मौखिक परंपरेने चालत आलेला हा सांस्कृतिक ठेवा म्हणजे आपले वैभव आहे. आजच्या चंगळवादी, आधुनिकीकरणाच्या नावावर अंधानुकरण करणाऱ्या आणि आपल्या संस्कृतीच्या होत असलेल्या विकृतीकरणाच्या पार्श्वभूमीवर या ओव्यांमधून प्रकट होणारे जीवनदर्शन, विचार, संस्कार हे भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारे आहेत. त्यामुळे या सांस्कृतिक, साहित्यिक ठेव्याचे जतन, संवर्धन आणि संक्रमण करणे हे आपले सामाजिक नैतिक कर्तव्यच आहे.